ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१ !



jpp51_51@jnanaprabodhini.org

गोष्ट क्र. ३

१७ जानेवारी २०२१

## *रामदास पळसुले*
*(१९७२- १९७८)*




शिक्षण आणि शिक्षणा व्यतिरिक्त राष्ट्रभक्तीचे संस्कार, उज्ज्वल परंपरेचा अभिमान निर्माण करणारे संस्कार तेव्हा माझ्या मनावर झाले हे त्यावेळी अजिबात कळले नाही. प्रबोधिनी विश्वातून बाहेर पडल्यावर मला समजायला लागले की आपण किती उत्तम प्रक्रियेमधून घडलो आहोत.

आपण एखादी गोष्ट संपूर्ण एकाग्रतेने केली तर त्या क्षेत्रात आपण नक्की यशस्वी होतो. तुम्ही १००% झोकून देऊन कुठल्याही क्षेत्रात उतरलात तर १००% हून अधिक यश तुम्हाला मिळेल!

**प्रशालेतल्या आठवणी आणि माझा वर्ग**

माझ्या आयुष्यात अनेक गोष्टी मी ठरवून केलेल्या नाहीत तर त्या केवळ परमेश्वर कृपेने झालेल्या आहेत. माझे प्राथमिक शिक्षण नवीन मराठी शाळेत झाले. त्यानंतर परमेश्वराची कृपा म्हणून माझी ज्ञान प्रबोधिनी प्रशालेमध्ये निवड झाली. आई-वडिलांनी मला परीक्षेला बसवले होते आणि मी काहीही तयारी न करता परीक्षेला बसलो! प्रशालेत आल्यावर पहिला धक्का मला बसला तो म्हणजे क्रीडांगण! पहिल्याच दिवशी मी प्रचंड दमलो. त्यादिवशी मी घरी जाऊन जेवणही न करता जे झोपलो ते थेट दुसऱ्या दिवशी सकाळी डोळे उघडले. रेणुका स्वरूप मैदानावर शाखेवर जायची मला सवय होती मात्र प्रबोधिनीत आल्यावर क्रीडांगणावर भरपूर खेळून भरपूर दमायचो. हळूहळू क्रीडांगण माझ्या अंगात इतके भिनले की कधी एकदा शाळा सुटून क्रीडांगण सुरू होतेय असे व्हायचे. त्याकाळी सर्व देशी खेळ आम्ही खेळायचो. शाळेच्या कबड्डी, गोल खो-खो, लंगडी, आट्या-पाट्याच्या संघात देखील मी होतो. जोडीने फुटबॉल, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल असे खेळ देखील भरपूर खेळायचो. त्यावेळी आम्ही ५ ते ११वी वर्गातील सर्व सव्वा दोनशे मुले एकमेकांना ओळखायचो. मी माझ्या आधीचे सहा वर्ग आणि नंतरचे पाच वर्ग ह्या सर्व मित्रांना अजूनही ओळखतो. त्यावेळी आमच्यामध्ये जुळलेल्या बंधाचे मला आज फार कौतुक वाटते! मोठ्या वर्गातील मुले म्हणजे आपले मोठे भाऊ आणि खालच्या वर्गातील मुले म्हणजे आपले छोटे भाऊ असे कौटुंबिक वातावरण प्रबोधिनीमध्ये होते. आपल्या वर्गातील मित्र म्हणजे तर जिगरी! आम्हाला आमच्या वर्गातील सगळ्यांची संपूर्ण नावे पाठ होती. मला अजूनही लक्षात आहे, किरण हनुमंत बर्वे, संदीप काशीनाथ गोरे, राजेंद्र रामचंद्र वैद्य, सुनील सुधीर सोहोनी....अशी सगळी नावे घेता येतील! कुटुंबापेक्षा जास्त आपुलकी आमच्या वर्गात होती आणि आहे! झोपेच्या वेळा सोडल्या तर अभ्यासाला, फिरायला, अमावस्येच्या रात्री राजगडावर जा, असे अनेक उद्योग करायला आम्ही एकत्र असायचो. गेल्या काही वर्षांत आम्ही वर्गमित्र नियमित भेटतो.





**आप्पा आणि सर्व शिक्षक**

तेव्हाचे आमचे सर्व शिक्षक खूपच कमालीचे शिकवायचे आणि आम्हाला विषयाची आवड निर्माण करायचे. मला आठवतं विलास चाफेकर, वामनराव, गणित आणि भूमितीचे जोगळेकर सर, हिंदीच्या सुलोचनाताई लिमये, इंग्रजीच्या रुक्मा बॅनर्जी, विनयराव हर्डीकर, इतिहासाचे सुरेश परचुरे सर असे सर्व शिक्षक आजही लक्षात आहेत. सगळ्यांनी घोकंपट्टी करण्यावर कधीही भर न देता, आम्हा सर्वांना विषयांची गोडी लावली. आज मला लक्षात येतय की आपण किती चांगल्या शाळेत शिकलो आणि त्याबद्दल मी परमेश्वराचे आजही आभार मानतो! शिक्षण आणि शिक्षणा व्यतिरिक्त राष्ट्रभक्तीचे संस्कार, उज्ज्वल परंपरेचा अभिमान निर्माण करणारे संस्कार तेव्हा माझ्या मनावर झाले हे त्यावेळी अजिबात कळले नाही. प्रबोधिनी विश्वातून बाहेर



पडल्यावर मला समजायला लागले की आपण किती उत्तम प्रक्रियेमधून घडलो आहोत. त्याचाच परिणाम म्हणजे आपले आत्ताचे लष्कर प्रमुख, उपप्रमुख, RAW मध्ये किंवा CAG मध्ये अधिकारी हे आपल्या प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी आहेत. ज्ञान प्रबोधिनी सारखी शाळा प्रत्येक गावात असेल तर आपला देश किती पुढे जाईल असा विचार मी नेहमी करत असतो. एकूण देशभरात प्रबोधिनी सारख्या १०० शाळा जर सुरू झाल्या तर देशाचे रूप नक्की पालटेल असा माझा विश्वास आहे!

मला आप्पांचा सहवास खूप लाभला. आप्पांचे कार्यालय आणि त्याच्या बाहेर आम्ही अनेक वेळा जात असू. मैदानावर मोहनराव आम्हाला खो-खो, कबड्डीमध्ये सूर मारायला शिकवत. त्यावेळी थोडे जरी लागले तरी आम्ही लगेच प्रथमोपचारासाठी आप्पांच्या किंवा त्यांच्या शेजारच्या खोलीत जात असू. आम्ही गेलो की आप्पा अगदी प्रेमाने चौकशी करायचे. त्यावेळी मी तबला वादन फार करायचो नाही मात्र गायनात नेहमी पुढे असायचो. त्यामुळे पद्य, प्रार्थना आणि उपासना सांगण्यात मी नेहमी असायचो. ज्यावेळी विसूभाऊ नसायचे त्यावेळी ते सर्व मी पूर्ण करायचो. आप्पांनी स्वत: मला अनेक पद्यं शिकवली होती. आप्पांनी आपल्या मुलासारखे माझ्यावर प्रेम केले. आप्पांचे आणि माझे नाते वडील-मुलाप्रमाणेच होते. माझी विवेकानंदांशी पहिली ओळख आमच्या वर्गात आप्पांमुळे झाली. आप्पा विवेकानंदांवर भरभरून बोलत असत आणि आम्हाला म्हणत, तुम्ही सुद्धा विवेकानंदांसारखे झाले पाहिजे. त्यांच्याप्रमाणे स्वत:ला घडवले पाहिजे! त्याचा माझ्या मनावर फारच परिणाम झाला. ३०-३५ वर्षांपूर्वी आमचा वाडा पाडून इमारत बांधण्याचे काम सुरू असताना माझ्या शालेय काळाच्या माझ्या दैनंदिनी सापडल्या. त्या पुन्हा वाचताना 'आप्पांनी आज काय सांगितले? आणि 'मला काय व्हावेसे वाटतेय?' असे सगळे रोजचे लिहिलेले वाचताना मला फार छान वाटलं! आम्ही किती भाग्यवान होतो आणि आम्हाला काय संस्कार मिळाले हे मला ते वाचून पुन्हा लक्षात आले.

**शिबिरांच्या आठवणी**

हिवाळी शिबिरं म्हणजे माझ्या लक्षात राहिलेल्या आठवणींपैकी एक! आमचे पहिले हिवाळी शिबिर हे प्रबोधिनीच्या वास्तूमध्येच झाले होते. तिथेच राहायचे, सकाळी लवकर क्रीडांगण, सकस आहार, वैचारिक, भोजन, विश्रांती, पुन्हा संध्याकाळचे क्रीडांगण, सहभोजन, वैचारिक असे ते शिबिर होते. तेव्हा 'विठ्ठलवाडी ते प्रबोधिनी' अशी आमची पळण्याची शर्यत झाली होती. त्यावेळी मी इतका पळालो ह्याचे मला आज खूप आश्चर्य वाटतेय! पुढच्या वर्षी आमचे शिबिर प्रचंड कडाक्याच्या थंडीत शिवनेरीवर झाले होते. त्या गोठवणाऱ्या थंडीत सकाळी प्रात:र्विधी, टाक्याच्या गार पाण्याने आंघोळी, स्वत:चे जेवण तयार करणे, दोन पथकांमधील लुटूपुटूच्या लढाया असे सगळे कमाल अनुभव आहेत. रात्री परचुरे सर पोवाडे घ्यायचे आणि मी तबला वाजवायचो. त्यानंतरचे शिबिर शिवगंगा नदीच्या काठी एका मैदानावर झाले. आपला कारखाना आणि काही वस्त्या सोडल्या तर तिथे त्यावेळी काहीही नव्हते. शिबिरासाठी 'पुणे-शिवापूर' आणि पुन्हा परत 'शिवापूर-पुणे' असे सायकलवर जाणे अनिवार्य असायचे. शिबिरांसोबत वैयक्तिक कार्य आणि गटकार्य देखील असायचे. मला एकदा पुण्यातील विविध धार्मिक स्थळांना भेटी देऊन तिथल्या धर्मगुरुंशी बोलायचे असे व्यक्तिकार्य दिले होते! एका वर्षी मला पंडित भीमसेन जोशी ह्यांच्या लोकमान्य नगरमधल्या घरी जाऊन त्यांची मुलाखत घेतल्याचे आठवते. दरवर्षी गणेशोत्सवामध्ये गणेश प्रतिष्ठापना, मिरवणुका आणि त्याचा सराव ह्यात खूप मजा असायची. मी ध्वज, ढोल, ताशा, बर्ची असे सगळे आनंदाने केले आहे. त्याकाळी ह्या अनुभवांची किंमत समजली नाही, मात्र नकळत आम्ही खूप समृद्ध होत गेलो. ती सहा वर्षं आयुष्यातील एक सुवर्णकाळ होता!

**कुटुंब – अभिमान आणि पाठिंबा**

माझ्या घरी व्यावसायिक संगीत करणारे कुणी नव्हते. मात्र शास्त्रीय संगीताची घरात आवड होती. माझी आजी शांताबाई गोखले ह्या एक सामाजिक कार्यकर्त्या, त्याकाळच्या हिंदू महासभेच्या पुण्याच्या अध्यक्षा होत्या. त्यामुळे जेव्हा सावरकर पुण्यात येत असत तेव्हा ते आमच्या वाड्यात अनेकदा येत. माझ्या वडिलांनी सावरकरांच्या 'कमला' आणि 'अग्निजा' ह्या काव्यांचे संस्कृत भाषांतर करून सावरकरांना वाचायला दिले होते. सावरकरांनी त्याच्यावर लेखी अभिप्राय दिला, की 'ही काव्ये मला मूळ काव्ये वाटत आहेत आणि मी त्याचा मराठी अनुवाद लिहिला आहे असे मला वाटतेय'. माझ्या वडिलांनी 'वैनायकम्' नावाचे ५००० श्लोकांचे सावरकर चरित्र संस्कृतमध्ये लिहिले आहे. त्याला राष्ट्रपती पुरस्कार, कालिदास पुरस्कार आणि इतर अनेक पुरस्कार मिळाले. असे सगळे सांस्कृतिक वातावरण आमच्या कुटुंबात असल्याने लहानपणापासून माझ्या कानांवर ह्या गोष्टी पडत गेल्या. माझी आई मला लहानपणी कळतही नव्हते तेव्हापासून 'सवाई गंधर्व

महोत्सव' ऐकायला न्यायची. इतके रसिक, त्यांची दाद आणि विविध सादरीकरणे पाहून त्याचे आकर्षण निर्माण झाले. त्यावेळी सवाईमध्ये पंडित सामताप्रसाद नेहमी तबला वादन करायला यायचे. त्यांचे वादन आणि त्यांना मिळणारी दाद पाहून मला लहानपणी वाटले आपणही तबला वादक व्हावे. मी हे घरी सांगितल्यावर माझ्या पालकांनी मला चौथीमध्ये सामंत गुरुजी ह्यांच्या शिकवणी वर्गाला पाठवले. पुढची चार वर्षं मी तिथे आठवड्यातून तीन दिवस तबला शिकायला जायचो. नंतर प्रबोधिनीमध्ये अनेक उपक्रम करत असल्याने माझा तो वर्ग सुटला. मधील काळात मोठा खंड पडला. त्यावेळी दुर्दैवाने सामंत गुरुजींचे निधन झाले आणि त्यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्ताच्या कार्यक्रमात पंडित सुरेश तळवलकरांचे तबला वादन मी ऐकले. ते ऐकून मी भारावून गेलो आणि ठरवले की आता पुन्हा तबला शिकायचा. कार्यक्रमानंतर मी त्यांना भेटलो. त्यांनी मला दुसऱ्या दिवशी तबला घेऊन बोलावले. त्याप्रमाणे मी ते जिथे उतरले होते तिथे पोचलो. मी त्यांना काहीतरी वाजवून दाखवले. त्यांनी सगळी चौकशी केली आणि मला विचारले की तुला तबला कशासाठी शिकायचा आहे? मी त्यांना सांगितले, 'की लहानपणी मी शिकायचो, आवड आहे आणि तुमचे वादन ऐकून प्रभावित झालो म्हणून तुमच्याकडून शिकायची इच्छा आहे'. त्यावर गुरुजी म्हणाले, 'तू अजून शिकतो आहेस. इंजिनियर आहेस. नोकरी करतो आहेस. तुझे वयदेखील जास्त आहे आणि तुझा हात अत्यंत खराब आहे. बराच खंड मध्ये झाला त्यामुळे तुला सगळं पहिल्यापासून शिकायला लागेल. आणि तू आवड म्हणून शिकणार असशील तर मी शिकवत नाही. तुला माझ्याकडे तबला शिकायचा असेल तर तुला पूर्ण वेळ मुंबईत माझ्या इथे राहून गरू-शिष्य परंपरेतून फक्त तबला शिकायला लागेल. ह्यासाठी तुझी तयारी आहे का?' त्यावर मी माझी तयारी दर्शवली आणि घरी विचारून कळवतो असे सांगितले. मी सुदैवी अशा करता आहे, की चांगल्या शाळेत मला प्रवेश मिळाला आणि चांगले संस्कार झाले. आमच्या पिढीला कुठलीही प्रलोभने नव्हती आणि गरजा अत्यंत कमी होत्या. सामान्यांच्या आवाक्यात टीव्ही नव्हता, दुचाक्या नव्हत्या, अन्य चैनीच्या गोष्टी नव्हत्या, त्यामुळे कोणीही पूर्ण एकाग्र राहून शिकू शकत असे. त्यावेळी पुण्यात फक्त एक आणि महाराष्ट्रात फक्त पाच अभियांत्रिकी महाविद्यालये होती. मी घरच्यांना पटवले की मी इंजिनियर आहे आणि वाटेल तेव्हा पुन्हा नोकरी करू शकतो. त्यामुळे १-२ वर्षे मी तबला शिकायला जातो. मी गोरेगावला पोचलो तेव्हा एक-दोन वर्षांसाठी म्हणून आलो होतो आणि त्याची पुढे साधारण सहा वर्षं झाली. संगीताच्या दृष्टीने हा सुवर्णकाळ होता. कुठल्याही व्यावसायिक वादनाचा विचार त्यावेळी मनात नव्हता. फक्त लहानपणीची आंतरिक इच्छा आणि पंडितजींच्या वादनाचा माझ्यावर झालेला प्रभाव अशा दुहेरी हेतूने मी केवळ शिकत होतो. त्यावेळी झोपणे, जेवण आणि तबला वादन ह्या तीनच गोष्टी आम्ही केल्या. दिवसात १० ते १२ तास सराव असायचा आणि त्यामध्ये कधी मला श्रम वाटले नाहीत. त्यामधून मला आनंद मिळायचा. त्यामुळे खूप खडतर काळ सुरू आहे, आपण कष्ट करतोय असे मला कधीच वाटले नाही. मी २८ वर्षांचा झालो त्यावेळी घरच्यांना चिंता वाटायला लागली आणि त्यांनी गुरुजींशी संवाद केला असेल. त्यानुसार मला गुरुजींनी पुण्याला परतायला सांगितले. स्वतःच्या पोटा-पाण्याचेही पहा आणि वेळ मिळेल तसा शिकायला येत रहा असे गुरुजींनी सांगितले. मी पुण्यात आलो आणि माझा एक छोटा व्यवसाय सुरू केला. पुढे बारा वर्षं मी व्यवसाय केला. त्यादरम्यान ९ ते १० तास व्यवसायाला दिले, तरी दिवसाचे ४ ते ५ तास मी तबल्याला देत असे. पहाटे ५ला उठून ६ ते ९ आणि रात्री पुन्हा २ तास मी तबल्याचा रियाज करीत असे. त्या दहा-बारा वर्षांत मी एकही मिनिट टीव्ही पाहण्यात, अगदी रामायण, महाभारत, बुनियाद अशा सगळ्या प्रसिद्ध मालिका असल्या तरी किंवा मित्रांमध्ये गप्पा मारण्यात अशा कुठल्याही पद्धतीने वाया घालवले नाही. प्रबोधिनी मधून बाहेर पडल्यावर मी फक्त तबला शिकलो आणि तबल्यामध्ये रियाज करताना झोकून द्यायला शिकलो. मात्र हे शिकताना देखील अवघड गेले नाही ह्याचे कारण प्रबोधिनीच आहे. आम्ही सकाळी ९ वाजता प्रबोधिनीमध्ये यायचो आणि रात्री ८-९ वाजेपर्यंत तिथेच असायचो. त्यामुळे एखाद्या गोष्टीसाठी झोकून देणे, पूर्णपणे वाहून घेणे हे संस्कार तेव्हाच मिळाले. त्यामुळे मी गुरुजींकडे शिकत असताना माझ्याबरोबरचे इतर शिकणारे दोन तासाने मोकळीक घ्यायचे, टाईमपास करायचे, मी मात्र सलग एका जागेवर बसून तबला वाजवायचो. हळूहळू मला कार्यक्रम मिळू लागले. एक क्षण असा आला की मला व्यवसाय आणि तबला यापैकी एकाची निवड करायला लागेल हे जाणवले. मी माझ्या आयुष्यात ठरवून फार कमी गोष्टी केल्या. ज्या-ज्या चांगल्या गोष्टी झाल्या त्या परमेश्वराची कृपा, आई-वडिलांचे आशीर्वाद आणि शाळेच्या संस्कारांमुळे असे मी मानतो. आयुष्यात कधी आपल्याला असे वाटायला नको, की मी खूप काही केले, हे सगळे माझे कर्तुत्व आहे. अनेकांची मदत, आशीर्वाद आणि परमेश्वराच्या कृपेने हे घडत असते.

**वाटचालीतले सोबती**

माझ्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील मित्रांनी मला बरीच मदत केली. घरच्यांना पटवण्यापासून ते आर्थिक मदत असे सगळे साहाय्य मित्रांनी केले. मी २८व्या वर्षी पुण्यात परत आलो तेव्हा माझ्या बँकेच्या खात्यात फक्त ४०० रुपये होते.

मात्र खूप मोठे संकट आहे अशी काही परिस्थिती नव्हती. १२वी नंतर मेडिकलला मला अगदी पहिल्या यादीत सहज प्रवेश मिळत होता. पण माझे प्रबोधिनीमधील मित्र अभियांत्रिकीला गेले म्हणून आणि १२वीमध्ये जीवशास्त्र विषयाच्या प्रात्यक्षिकांमुळे आलेली शिसारी अशा दोन कारणांनी मी अभियांत्रिकीच्या शिक्षणाचा निर्णय घेतला आणि तो 'गेमचेंजर' ठरला. महाविद्यालयात मला माझ्याच बॅचमध्ये पंडित विजय कोपरकर भेटले आणि त्यांच्या नादाने मी पुन्हा तबल्याकडे वळालो. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये मला इतर संगीत क्षेत्रातील मित्र, सतारवादक पंडित सुधीर फडके, संतूरवादक डॉक्टर धनंजय दैठणकर, पेटीवादक अरविंद थत्ते, पंडित राजेंद्र कंदलगावकर हे सगळे भेटले. आमचा असा एक गट बनला होता आणि आमच्या एकमेकांच्या घरी गायन-वादनाच्या बैठकी व्हायच्या ज्याच्यातून मी पुन्हा संगीताकडे ओढला गेलो. मधला १०-१२ वर्षांचा खंड भरून यायला  लागला.

माझा एक विश्वास आहे आणि तो आता अनुभावातून अधिक दृढ झाला आहे तो म्हणजे, आपण एखादी गोष्ट संपूर्ण एकाग्रतेने केली तर त्या क्षेत्रात आपण नक्की यशस्वी होतो. तुम्ही १००% झोकून देऊन कुठल्याही क्षेत्रात उतरलात तर १००% हून अधिक यश तुम्हाला मिळेल! आपला जन्म, मृत्यू, जन्माचे ठिकाण, आई-वडील ह्या मुख्य गोष्टी आपल्या हातात नसतात. आपण ध्येय ठरवून अविरत कार्यरत राहणे मात्र आपल्या हातात असते. मला असं वाटतं की परमेश्वराने तुमच्या ह्या आयुष्याचा उद्देश पूर्वनिश्चित केलेला असतो. त्यामुळे आपण किती यश मिळवले,  कशाला आपण महत्त्व द्यायचे हे सापेक्ष असते. आपण किती मोठ्या कार्यक्रमात वादन करतो, किती पैसे मिळवतो, किती प्रसिद्ध आहोत ह्यात यशाचे मूल्यमापन मी करत नाही. मी तबला शिकायला लागलो तेव्हा एकच ध्येय होते,  ह्या कलेतून आनंद मिळवणे आणि तो आनंद रसिकांना, शिष्यांना वाटणे. आजही माझे तेच ध्येय असल्याने आयुष्यात अपयश आले आहे किंवा आपण खडतर परिस्थितीशी झगडतोय असे मला कधी वाटले नाही. गुरुजी आणि मित्रांमुळे मी अनेक मोठ्ठ्या व्यक्तींच्या संपर्कात आलो. त्यांच्याबरोबर वादन केले. माझ्या पिढीच्या वादकांमध्ये आज मी सर्वोत्तम वादकांपैकी एक म्हणून गणला जातो ह्याचा देखील मला आनंद आहे. त्यामुळे परमेश्वराने भरभरून दिले आहे आणि अशीच उत्तरोत्तर चांगल्या वादनाची संधी मिळत राहो हीच ईच्छा आहे. एक आव्हान मात्र अव्याहत माझ्या पुढे असते ते म्हणजे काल पेक्षा आज नवीन, चांगले आणि कलात्मक काहीतरी सुचणे आणि वाजवणे! प्रत्येक कलाकाराला, आहे त्याच्या पुढे जाणे आणि नवनिर्मिती करणे गरजेचे असते.

कला माझ्यासाठी सर्व काही आहे. मी कलाक्षेत्राकडे वळलो नसतो तर काय केले असते ह्याची कल्पनादेखील मी करू शकत नाही इतका मी 'कलामय' आहे. अनेकदा ह्या क्षेत्रात अशी अनेक लोकं भेटतात की त्यांची कला सोडली तर सामान्य व्यक्तीपेक्षाही माणूस म्हणून खालच्या दर्जाची असतात, तेव्हा दुःख होते. संगीत कलेची आराधना ही परमेश्वराच्या जवळ जायला साहाय्यभूत ठरते. मग असे कलाकार का असतात ह्याचा विचार करून विषाद वाटतो. मात्र मी विचार करतो की जेव्हा तुम्ही कलेकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहता त्यावेळी अन्य व्यवसायांप्रमाणे त्यांतील चुकीच्या गोष्टी आपोआप कला क्षेत्रातही येत असतील. आपण नेहमी कार्यक्रम आणि पैसा दुय्यम ठेवून आनंद महत्त्वाचा मानला पाहिजे. माझ्यावर हा संस्कार आपोआप झाला आहे. आणि असे कलेचे उपासक मला आदर्श वाटतात! माझ्या बाबतीत असे अनेकदा झाले आहे, की कधी नैराश्य आले, दुःख झालेले असले की मी तबला हातात घेतो आणि सहज सगळे विसरून जाऊन पुन्हा मन प्रफुल्लित होते! कलेची एक प्रकारची 'नशा' असते! मी एखादा दिवस तबला वाजवला नाही असे झाले नाही आणि होऊच शकत नाही, इतकी रियाजाची आणि साधनेची नशा गुरुजींनी मला लावली. अशी नशा ज्या कलाकाराला लागते तो उच्च पातळीवर जातो.

## राष्ट्रप्रेम आणि विद्यादान

शाळेत असताना नकळत आपल्यावर राष्ट्रभक्ती आणि समाजकार्याचे संस्कार होतात. मी १०वी मध्ये असताना आंध्र प्रदेशात मोठी त्सुनामी आली होती. त्या मदतकार्याच्या पथकात मी गेलो होतो. स्वच्छता, झोपड्या बांधण्यापासून ते प्रेताचे अग्निसंस्कार अशा सर्व प्रकारची कामे आम्ही तिथे केली. त्यावेळी आम्हाला ह्या कामाचे पूर्ण महत्त्व उमगले नसले तरी आज जाणवते आहे, की आपण अशा अनुभवांतून किती समृद्ध झालो आहोत. मी हे सहसा कुठे सांगत नाही. मात्र इथे नमूद करायला आवडेल, की मी जे विद्यादानाचे कार्य करतो आहे, जे कार्य माझ्याकडून होते आहे त्याची प्रेरणा प्रशालेचीच ! मी २००० साली पूर्णवेळ तबला वादनाकडे वळलो असलो तरी त्याच्या आधीपासून मी तबला शिकवायला सुरू केले. विद्यापीठात गुरू म्हणून नियुक्त होण्याआधी सुद्धा माझ्याकडे मुले शिकत होती. १९९२ साली माझ्याकडे पहिला मुलगा शिकायला आला. आत्तापर्यंत मी एकूण ३५० हून अधिक विद्यार्थ्यांना शिकवले आहेत. त्यातील २०० हून अधिक सध्या पूर्णवेळ तबला वादन करत आहेत. मी २५+ वर्षे जे शिकवतोय ते पैशासाठी शिकवत नाही तर फक्त तो कलेचा आनंद वाटण्याच्या हेतूनेच शिकवतोय आणि हे संस्कार मला प्रबोधीनीतून मिळाले अशी माझी ठाम समजूत आहे.

माझ्या आयुष्यात अशा अनेक व्यक्ती आहेत ज्यांचा माझ्यावर प्रभाव पडला आणि त्यांच्या विचारांमुळे मी असा घडलो. त्यातील निश्चितच ठळक उल्लेख म्हणजे आप्पा, वामनराव, शरदराव सुंकर, विवेक कुलकर्णी आणि त्या काळातील अन्य शिक्षक ह्यांचा आहे. कदाचित मी योग्यवेळी योग्य ठिकाणी असल्याने, आणि त्याकाळी इतकी स्पर्धात्मकता नसल्याने माझा विद्यार्थी ते कलाकार हा प्रवास सुखकर झाला. गुरुजींमुळे नृत्यांगना रोहिणी भाटे यांच्याबरोबर मी साधारण १९८८ पासून वाजवायला सुरुवात केली. विजय कोपरकरमुळे मी १९८८ पासूनच पंडित जितेंद्र अभिषेकींबरोबर वाजवायला सुरूवात केली. १९९२ साली मी पंडित जसराजजींबरोबर वाजवायला सुरुवात केली होती. मला आता असे वाटते की खूप लवकर मला चांगली संधी मिळाली. थोडा अजून परिपक्व झाल्यावर ह्या संधी मिळाल्या असत्या तर मी त्याचा अधिक चांगला आस्वाद घेतला असता. ह्या सगळ्यांबरोबर राहून माझ्यावर परिपूर्ण संगीताचे चांगले संस्कार झाले. माझ्याकडे आज अनेक गायक, गायिका, नर्तक देखील शिकतात. असे फार मोजके वादक आहेत जे गायनाची संगत चांगली करतात, फ्यूजन बरोबर चांगले वाजवतात, कथ्थक नृत्याची, वाद्य-संगीताची संगत चांगली करतात आणि सोलोपण चांगले वाजवतात. मला हे शक्य झाले ते गुरुजी आणि अशा मोठ्ठ्या कलाकारांच्या संगतीतून झालेल्या संस्कारांमुळे! कदाचित संस्कार करवून घेण्याची मानसिकता देखील आधी तयार व्हायला लागत असेल. जिथून-जिथून मिळतील तिथून चांगले विचार, चांगले संस्कार ग्रहण करण्याची मानसिक जडण-घडण माझी प्रबोधिनीमुळेच झाली आहे.

मी चार वर्षांपूर्वी 'आवर्तन गुरुकुल' सुरू केले. ज्यामध्ये शास्त्रीय गायन, ध्रुपद गायन, तबला वादन, पखवाज वादन, भरतनाट्यम् आणि कथ्थक नृत्य अशा सहा कला सहा वेगवेगळे गुरू शिकवतात. तेथील विद्यार्थ्यांना प्रवेश देताना ज्याच्यामध्ये कलाकार बनण्याची क्षमता आहे असे विद्यार्थी आम्ही निवडून घेतो. अशी ८५ मुले सध्या गुरुकुल पद्धतीने शिकत आहेत. पंडित सुरेश तळवळकर, पंडित उल्हास कशाळकर, पंडित उदय भवाळकर, श्रीमती शमा भाटे, श्रीमती सुचेता भिडे-चापेकर असे सगळे दिग्गज गुरू मिळून आम्ही मुलांना विनामोबादला शिकवतो. उत्तमोत्तम कलाकार तयार व्हावेत आणि आपली शास्त्रीय संगीत-नृत्याची परंपरा रुजावी आणि वाढावी ह्यासाठी गुरुकुलात प्रयत्न करत आहोत. कलाकाराला समाजाशी किंवा राष्ट्राशी काही देणे-घेणे नाही, केवळ कार्यक्रम आणि त्यातला पैसा ह्यातच तो मश्गुल असतो असा सध्या एक ट्रेंड दिसून येतो. त्यामुळे नव्या कलाकारांवर राष्ट्रभक्ती आणि समाजाभिमुखतेचे संस्कार करण्याचे प्रयत्नदेखील गुरुकुलात करणार आहोत. गुरुकुलातून घडलेले कलाकार जगामध्ये भारताचे नाव उज्ज्वल करतील, मान उंचावतील. मी १९८८ साली विदेशात पहिला दौरा केला आणि त्यानंतर जवळपास दरवर्षी मी परदेशात कार्यक्रम करत असतो. हे शतक सुरू होण्यापूर्वी जगात भारताची ओळख ही शास्त्रीय संगीत-नृत्य, योगाभ्यास आणि अध्यात्मिक संस्कृतीमुळे होती. त्यामुळे शास्त्रीय संगीत-नृत्याकडे केवळ व्यावसायिक दृष्टिकोनातून न पाहता एक मोठी देदीप्यमान संस्कृती म्हणून पहायला आपण शिकलं पाहिजे. कलेला आणि कलाकाराला समजाशी जोडून देशाचे नाव उंचावणे हे माझे पुढील उद्दिष्ट आहे. आमच्या ह्या विनामूल्य शिक्षण प्रयोगाला अनेक संस्था, प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी भरभरून आर्थिक मदत करत असतात आणि लवकरच केंद्र सरकारच्या सांस्कृतिक विभागातून मदत मिळण्याची शक्यता आहे.

मी २००० साली पूर्णवेळ तबला वादनाचा निर्णय घेतला त्यावेळी माझे उत्पन्न एकदम कमी झाले होते. मला दरवर्षी विदेशातून आयोजक बोलवायचे आणि मी कार्यक्रमास जायचो. त्यावेळी मी विचार केला की स्वत: काहीतरी केले पाहिजे आणि मी विचार केला, असे सांगीतिक दौरे (concert tours) आपण आयोजित करूयात. युरोप, अमेरिका, कॅनडा, यू.ए.ई. ऑस्ट्रेलिया अशा ठिकाणी मग मीच दौरे आयोजित करायला सुरू केले. ह्यातून आर्थिक स्थिरता आणि व्यावसायिक यश मिळत गेले. दरवर्षी किमान एखाद्या कलाकाराचा अमेरिका, एखाद्या कलाकाराचा यू.ए.ई., युरोप असा कार्यक्रम मी आखून देत असतो. माझ्या परदेशातल्या ओळखीतल्या मित्रांनी ह्याला साहाय्य केले आणि आजही अव्याहतपणे हे काम सुरू आहे. केवळ आर्थिक हेतूने नव्हे तर भारतीय कला जगात पोचते आहे ह्यासाठी आम्ही हे करतो. परदेशी विद्यापीठांमध्ये काही सत्र घेऊन, तिथल्या लोकांच्या गटांमध्ये आम्ही जागरूकता निर्माण करण्याचे कामदेखील करतो.

१९९२ साली दुर्दैवाने माझी आई रक्ताच्या कॅन्सरमुळे गेली. तेव्हा आईकरता रक्त मिळवायला खूप त्रास झाला. तेव्हा मी आणि माझ्या भावाने आईच्या स्मृतीप्रित्यर्थ रक्तदान शिबिर घेण्याचे ठरवले. गेली १६-१७ वर्षं आम्ही निरंतर ही शिबिरे घेत असतो. जी काही चांगले मूल्ये, विचार आणि संस्कार मला घरच्यांकडून, शाळेकडून मिळाले त्यामुळेच मी हे सगळे करू शकतो अशी माझी खात्री आहे. मला एकट्याला असे सगळे प्रयोग नक्कीच शक्य झाले नसते. वेळोवेळी माझ्या सहकार्यांची मला मदत झाली. श्रीकांत शिरोळकर आणि मी मिळून व्यवसाय केला. संगीत क्षेत्रातही मित्रांमुळेच मी नाव कमावू शकलो. 'आवर्तन गुरुकुल' मध्येही शिरीष कौलगुड, अनीता संजीव आणि श्रीकांत शिरोळकर आहेत त्यामुळे समर्थपणे काम सुरू आहे. मी संकल्पना सुचवली आणि त्याला संपूर्ण मूर्त स्वरूप द्यायला हे तिघे अथक प्रयत्न करत आहेत.

नवीन आणि कलात्मक विचार करायचे संस्कार माझ्यावर गुरूंनी केले. सर्वसाधारणपणे गुरू-शिष्य परंपरेमध्ये गुरू सांगतील तेच शिष्याने करायचे असे असते. आमच्या गुरुजींनी ह्याला छेद देत आम्हाला स्वत:चा विचार करायला उद्युक्त केले, नवीन आणि कलात्मक विचार करायला प्रेरीत केले. एक वैचारिक घडण जमल्यावर आम्हाला त्यांनी मुक्तपणे विचार करून सादर करण्याची परवानगीदेखील दिली. 'जोडताल' हा काही माझा स्वत:चा विचार नसून मला गुरुजींकडूनच तो मिळाला आहे. माझ्यावर जरी गुरुजी, उस्ताद झाकीरभाई, पंडित अनींदो चटर्जी, पंडित स्वपनजी ह्या चौघांचा प्रभाव आहे आणि त्यांचा सहवास आणि संस्कार मला मिळालेले आहेत तरी मी ते वाजवतात तसेच वाजवायचा प्रयत्न कधी केला नाही. मी स्वत: विचार करून वाजवायचा प्रयत्न करतो. माझ्या सोलो वादनात फार कमी गोष्टी अशा असतात ज्यामागे माझा स्वत:चा असा काही विचार नाही. जसे शिकलो तसेच वाजवले अशा फार कमी गोष्टी माझ्या सादरीकरणामध्ये असतात. असे फार कमी तबलावादक आहेत जे स्वत:चा विचार करून वादन करतात आणि त्यापैकी मी एक आहे ह्याचा मला अभिमान आहे! अर्थात ह्याचे श्रेय माझ्या गुरुजींच्या संस्काराला जाते.










आई-वडिलांशी जसे नाते टिकून राहते तसेच प्रबोधिनीशी नाते कायम टिकून राहते. प्रत्यक्ष वास्तूमध्ये आलो नाही तरी मनामध्ये असणारे प्रबोधिनीचे स्थान हे अढळ आहे. मी जे काही आयुष्यात साध्य केले आहे त्यात प्रबोधिनी संस्कारांचा मोठा वाटा आहे हे मी वारंवार सांगत असतो. आता ह्याच संस्कारांनी पुढील पिढी घडवायचे काम मी करत आहे. संगीत-कला क्षेत्रात प्रत्यक्ष प्रबोधिनीचे काम तसे कमी आहे. मी सुदैवाने ह्या क्षेत्रात आलो आहे तर प्रबोधिनीचे विचार संगीत-कला क्षेत्रात रुजावे ह्यासाठी मी प्रयत्न करत आहे. नवीन प्रबोधकांना प्रबोधिनीच्या संस्कारांच्या आधारे तुम्ही आपले कार्यक्षेत्र निवडू शकाल हे मला सांगण्याची जरूर नाही. पण तुम्ही तन, मन आणि धनपूर्वक संपूर्ण कष्ट घेतले तर कुठल्याही क्षेत्रात नक्की यशस्वी व्हाल ह्याची मला खात्री आहे. राष्ट्रभक्ती तुम्ही कुठल्याही क्षेत्रात रुजवू शकाल ज्यायोगे येत्या काळात भारत विश्वगुरू होण्यात आपण आपला खारीचा वाटा उचलू शकू!

## Rapid Fire

१. आवडता चित्रपट - हिन्दी सांगायचा तर शोले, पाश्च्यात सांगायचा तर ' मॅकेनाज गोल्ड'

२. आवडते पुस्तक - मी फार कमी वाचली आहेत. पण मी वाचलेल्यापैकी 'an autobiography of yogi'

३. आवडता कलाकार - अनेक आहेत. मला सगळ्यांचे काहीना काहीतरी आवडते. उत्तर द्यायचेच झाले तर गायकांमध्ये उस्ताद बडे गुलाम अली खाँ साहेब, उस्ताद आमीर खाँ साहेब किंवा पंडिता किशोरी आमोणकर असे आवडते आहेत. वाद्य-वादकांमध्ये उस्ताद विलायत खाँ साहेब, पंडित रवीशंकरजी, पंडित निखिल बॅनर्जी हे सगळे माझे आवडते कलाकार आहेत.

४. आवडता छंद - तबला वाजवणे. त्या व्यतिरिक्त आत्ताचा आवडता छंद म्हणजे अर्णब गोस्वामी किंवा नाविका कुमार ह्यांचे वाद-विवाद पाहणे.

५. पहिली प्रतिक्रिया

  १. शागिर्द - गुरू-शिष्य परंपरा
  २. तबला - डग्गा
  ३. पुणे - पुणे तिथे काय उणे? पुण्यासारखे दुसरे कुठलेच सांस्कृतिक शहर नाही. आणि जिथे प्रबोधिनी आहे ते शहर उच्च असणारच ना!
  ४. पंडित सुरेश तळवळकर - आदर्श गुरू
  ५. आप्पा पेंडसे - आदर्श गुरू
  ६. ज्ञान प्रबोधिनी - एका वाक्यात सांगणे कठीण आहे. 'राष्ट्रप्रेमाची धगधगती ज्वाला'
  ७. जर पुन्हा आयुष्य जगायची संधी मिळाली तर तबला वादकाच्या व्यतिरिक्त काय व्हायला आवडेल?
     - मला असे वाटतेय की आत्ताच्या क्षेत्रातच पुन्हा जन्म मिळावा. जसे तुम्ही उंचीवर गेलात की क्षितिजाचा परीघ वाढतो. तसेच कुठल्याही क्षेत्रात असते. आपल्याला काय करता आले नाही अशा अनेक गोष्टी मला आत्ता दिसत आहेत आणि एका जन्मापुरते हे नसते. मी मानतो की उस्ताद झाकीर हुसेन ह्यांचा हा सातवा जन्म आहे. म्हणून मला वाटते, की मलाही पुढचे आयुष्य तबला वादक म्हणूनच मिळावे.

**रामदास पळसुले**
७४३ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
ramdas_palsule@yahoo.com
+91 9822846563 (c)

**मुलाखत व शब्दांकन - श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे    संपादन - मानसी बोडस, पल्लवी गोखले - नगरकर**

**आरेखन व मांडणी - निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org